# नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
# पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

दिनांक 19/12/2023 (मंगळवार) दुपार

---

## चोरी

**पो.स्टे. पारशिवनी** :— अंतर्गत १७ किमी अंतरावर मौजा सालई मोकासा शेतशिवार येथे दिनांक १२/१२/२०२३ चे २०.३० वा. ते दिनांक १३/१२/२०२३ चे ०९.२० वा. पुर्वी फिर्यादी नामे— महेंद्र काशीराम हेडाउ, वय ४५ वर्ष, रा. कनिष्ठ अभियंता दहेगाव जोशी महावितरण पारशिवनी यांनी पो.स्टे.ला येवुन तोंडी रिपोर्ट दिली की, महाराष्ट्र राज्य विजय वितरण कंपनी मर्या. उपविभाग पारशिवनी यांचे सालई शेत शिवारातील लघुदाब वाहीनीचे ६ सिमेंट पोल वरील लावलेले १) एएनटी कंडक्टर तार १४४० मि.कि. ३४२१४/— रू २) जीएनएटी कंडक्टर न्युटल तार ४८० मि. कि. ५८९४/— रू असा एकुण ४०१०८/— रूपयाचा मुद्देमाल कापुन कोणीतरी अज्ञात चोराने चोरून नेले व ६ सिमेंट पोल तोडुन किंमती १४२५६/— रू. चे नुकसान केले.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. पारशिवनी येथे अज्ञात आरोपीविरुध्द कलम ३७९, ४२७ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. अज्ञात आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोलीस हवालदार दिलीप टेकाम मो. क्र. ९७६४९३३५५४ हे करीत आहे.

## शासकीय कामकाजात अडथळा निर्माण करणाऱ्या आरोपीविरूद्ध गुन्हा नोंद

**पो.स्टे. काटोल** :— अंतर्गत ०१ किमी अंतरावर मोहन टॉकीज रोड गळपुरा काटोल येथे दिनांक १८/१२/२०२३ रोजी दुपारी १२/०० वा. दरम्यान फिर्यादी नामे— नितेश साहेबराव काळे, वरीष्ठ तंत्रज्ञ एम. एस. ई.डी. सी. एल. कार्यालय काटोल, वय ३७ वर्ष रा. आ. यु. डी. पी. काटोल व त्याचे दोन सहकारी हे विजग्राहक शकुंतलाबाई खेमराज काटकर रा. गळपुरा काटोल यांचेकडे मागील दोन महिन्याचे थकीत विज बिल वसुली करीता गेले असता यातील फिर्यादी याने विज ग्राहकास तुमचे थकीत विज बिल आजच भरा अन्यथा तुमचा विदयुत पुरवठा खंडीत होईल असे म्हटले असता यातील **आरोपी नामे— सचिन खेमराज काटकर, रा. गळपुरा काटोल** याने फिर्यादीस शिवीगाळी करून ''कोणात दम आहे ते मिटरला हात लावुन दाखवा मग मी दाखवतो'' अशी धमकी दिली तसेच फिर्यादीचे अंगावर धावुन आला व कॉलर पकडुन हातबुक्यांनी फिर्यादीस मारहाण केली त्यामुळे फिर्यादीस मार लागला आहे. यातील आरोपीने शासकीय कामात अडथळा निर्माण करून शासकीय कर्मचाऱ्यास मारहाण तसेच शिवीगाळी करून धमकी दिली.

सदर प्रकरणी फिर्यादी यांच्या रिपोर्टवरून पो.स्टे. काटोल येथे आरोपीविरुध्द कलम ३५३, ३३२, ५०४, ५०६ भादंवि. कायद्यान्वये गुन्हा नोंद केला आहे. गुन्हयाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक मेश्राम मो. नं. ८३८००७२२३६ हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर